
R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month.



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार

एकूण पाने १६
प्रती अंक रु. ५/-
वर्ष ५२ वे, अंक ६ वा, मुंबई.
एप्रिल २०१९
वार्षिक वर्गणी रु. ५०/-

## अनगळ स्मृती विशेषांक !





अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण
समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५२ वे, अंक ६ वा,
एप्रिल २०१९
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष
**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष
**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह
**श्री. प्रदीप कुलकर्णी**
कोषाध्यक्ष

*संपादक*
श्री. प्रभाकर अ. संत
*सह-संपादक*
डॉ. लक्ष्मीकांत दाणी
श्री. शरद पां. पारसनीस
श्री. प्रमोद नाईक
श्री. बापूराव कुलकर्णी

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**
**आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये**
**प्रति अंक ५ रुपये**
**दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३**
**ई मेल :** aadrbm@gmail.com
**संकेत स्थळ :** www.adrbmmahim.in

## संपादकीय

## अनगळ गेले ! पोकळी राहीली !

**संपादक**

वरील संपादकीयांत एकही शब्द नाही कारण अनगळ गेल्याने निर्माण झालेली पोकळी शब्दांनी भरुन निघण्यासारखी नाही. सांत्वनाचे व भविष्याविषयक सारे शब्द निरर्थक आहेत. अनगळांना भावपूर्ण श्रद्धांजली! **- संपादक**

## ध्येयवादाने प्रेरीत - ॲड. अनगळ

- **श्री. विलास जोशी, अध्यक्ष**, अ.दे.ऋ.ब्रा. मध्यवर्ती मंडळ

ॲड. अनगळ साहेब यांच्या विषयी लिहीतांना अक्षरशः मन गहिवरून येतं. एक अत्यंत हुषार व ध्येयवादी विचारांनी प्रेरित झालेलं व्यक्तिमत्व म्हणून ॲड. अनगळ साहेबांची ओळख होती. अखील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या अत्यंत अडचणीच्या काळात त्यांनी समर्थपणे व खंबीरपणे नेतृत्वाची धुरा सांभाळली. प्रत्येक कायदेशीर बाजूचा त्यांनी बारकाईनी अभ्यास केला आणि सरकारदरबारी आपली बाजू योग्य पध्दतीने मांडली आणि म्हणूनच आज आपण आपल्या वास्तूत अत्यंत सुखाने व आनंदाने वावरत आहोत. मंडळाच्या नियमित उत्पन्नाचा स्त्रोत केवळ ॲड. अनगळ साहेबांच्या कायदेशीर लढाईमुळे आणि त्यांच्यातील निष्णात कायदे तज्ञामुळेच प्राप्त झाला आहे, हे आवर्जून नमूद करावे लागते. त्यांनी आदेश दिल्यामुळेच मी अध्यक्ष पदाचे नामनिर्देशन अगदी शेवटच्या दिवशी सादर केले. वास्तविक ही जबाबदारी खूपच मोठी असल्यामुळे मी नम्रपणे नकार देत होतो, पण मा. अनगळ साहेबांनी हा माझा आदेश आहे असे सांगितले आणि मी तयार झालो. १५ दिवस अक्षरशः प्रचाराचा झंझावात सर्व सहकाऱ्यांच्या साथीने केला आणि आपण विजयी झालो. ॲड. अनगळ साहेबांना मनस्वी आनंद झाला. त्याच रात्री त्यांना प्रत्यक्ष भेटून मी नम्रपणे अभिवादन केले. प्रकृतीने साथ दिली नसली तरी त्यांची बुध्दी शेवटपर्यंत अत्यंत तल्लख होती ते वेळोवेळी मला आवश्यक सल्ला देत असत आणि म्हणूनच आपल्या मध्यवर्ती कार्यालयाचे नूतनीकरण केल्यावर प्रथम त्यांनाच आपण अत्यंत आदराने अध्यक्षांच्या खुर्चीत बसविले. तो क्षण माझ्या दृष्टीने खरोखरीच हृदयस्पर्शी होता. अगदी खरा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. आपले परिश्रम व जीवन कृतार्थ झाल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर विलसत होते. आजही नव्हे तर यापुढेही मी व माझे सर्व सहकारी त्यांच्याच ध्येयधोरणानुसार या पुढची वाटचाल करणार आहोत. आपली संपूर्ण वास्तु लवकरात लवकर पूर्णपणे तंटामुक्त होऊन आपल्या ताब्यात येईल आणि आपले मुंबई बाहेरील विद्यार्थी आणि ज्ञाती बांधवांची उत्तम सोय आपण करू शकू असा मला विश्वास आहे आणि हीच ॲड. अनगळ साहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल. ॲड. अनगळ यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

---

## 'आमचे अनगळ सर'

- **श्री. प्रभाकर कुलकर्णी**, कार्याध्यक्ष

२००९-१० साली माझी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले संस्थेच्या कार्यवाहपदी निवड झाली. त्यानंतर मी कै. अनगळ सरांच्या संपर्कात आलो. त्यांची कामाची तडफ, कायदेशीर ज्ञान, संस्थेबद्दल असलेले त्यांचे प्रेम व माझ्यासारख्या नवख्या कार्यकर्त्याला त्यांच्याकडून मिळणारे प्रोत्साहन हे सर्व अनुभवून मला त्यांच्याबद्दल अतिशय आदर वाटत असे.

नोव्हेंबर २०११ मध्ये विलेपार्ले संस्थेचा अमृत महोत्सव साजरा झाला. त्यावेळी ते स्वतः दररोज कार्यालयाला भेट देऊन सर्व तयारीचा आढावा घेत असत. त्यांनी प्रसंगी पत्रके लिफाफ्यामध्ये भरण्याचे कामसुद्धा केले आहे. त्याच्याशिवाय प्रमुख पाहुण्यांना आमंत्रण देणे व इतर व्यवस्था बघणे ही कामे ते करत असत. त्यावेळचा त्यांचा उत्साह एवढा दांडगा होता की, आम्ही सगळे अचंबित व्हायचो. त्यावेळेपासून ते आमच्या सगळ्यांचे स्फूर्तीस्थान होते.

२०१०-११ पासून मी व आपले ज्येष्ठ सहकारी श्री. संत सर इतर सर्व मध्यवर्ती मंडळाच्या सहाय्याने २००१ पासून २०१० पर्यंत चाललेल्या मध्यवर्ती मंडळाच्या एकंदर कारभाराविषयी लढा देत होतो. या लढ्याचा एक भाग म्हणून आम्ही सर्वांनी धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचेकडे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० च्या ४१ड कलमाखाली तक्रार नोंदविली होती. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रुग्णालय, बृहनमुंबई यांचेकडे या चौकशीचे काम देण्यात आले होते. दोन ते तीन वर्षे लढा दिल्यानंतर शेवटी जून २०१२ रोजी त्यांनी मध्यवर्ती मंडळाच्या कारभारासाठी नवीन कार्यकारिणी मंडळ नेमण्याचे ठरविले व त्या दृष्टीने त्यांच्या कार्यालयाने इच्छुक सभासदांची नावे मागवली. दि. २२.०८.२०१२ रोजी त्यांनी स्वयंखुद्द चौकशी करून न्याय निर्णय पारीत केला. या निर्णयानुसार श्री. अनगळ सरांची अध्यक्ष म्हणून नेमणुक केली व इतर आठ सदस्यांची कार्यकारिणी मंडळावर नेमणूक केली. या मंडळींनी संस्थेचा ताबा घेतला जो काही पुर्वीच्या विश्वस्तांनी स्वतःकडे ठेवला होता. अनगळ सरांच्या नेतृत्वाखाली नेमण्यात आलेल्या विश्वस्तांना अक्षरशः कार्यालयाचे कुलुप तोडून कारभार हाती घ्यावा लागला. वयाच्या ८१ वर्षी सुद्धा अनगळ सरांचे हे

धैर्य व कार्यपद्धती बघुन मी खरोखरच जास्त प्रभावित झालो. यानंतर वरील न्यायनिर्णयाविरुद्ध पुर्वीच्या काही विश्वस्तांनी धर्मादाय आयुक्त यांचेकडे अपील केले. त्याच्या सुनावणी प्रसंगीसुद्धा अनगळांनी न्यासाची बाजू यशस्वीरित्या मांडली व हे अपील नामंजूर करण्यात आले. त्यानंतर वरील न्याय निर्णयाविरुद्ध शहर दिवाणी न्यायालय व उच्च न्यायालयात अपील करण्यात आले. याच्या सुनावणी दरम्यान अनगळ सरांनी केवळ संस्थेच्या प्रेमापोटी सुमारे ४ वर्षानंतर परत काळा कोट परिधान करुन संस्थेची बाजू यशस्वीपणे मांडली. त्याचे सर्वांनी कौतुक केले. या निर्णयाविरुद्धसुद्धा सुप्रीम कोर्टामध्ये झालेल्या अपीलामध्ये नेमलेल्या कायदेशीर सल्लागाराला अनगळ सरांनी मौलिक मार्गदर्शन केले व सरतेशेवटी सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी दिलेला २२.०८.२०१२ चा आदेश कायम करण्यात आला. या प्रवासादरम्यान मी अनगळ सरांना जवळुन पाहीले. त्यांची विश्वासार्हता, निस्पृहता, धारिष्ठ्य व कायद्याचे ज्ञान बघुन मी प्रभावीत झालो व त्यांच्या आदेशानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी नेमलेल्या कार्यकारिणी मंडळावर निमंत्रीत म्हणून काम करु लागलो.

२०१२-१३ साली मध्यवर्ती मंडळातील परिस्थिती अतिशय खराब होती. विशेषतः २००९ ते २०१३ पर्यंत आर्थिक हिशोब लिहिलेले नव्हते. तसेच रोकड रक्कमेमध्ये सुद्धा मोठी तफावत होती. अनेक खर्चाची बिले नव्हती. मिळालेल्या देणग्यांचा किंवा रक्कमांच्या पावत्या नव्हत्या, हिशोब नव्हते. या कार्यकालात काम केलेल्या त्यावेळच्या स्वयंघोषित विश्वस्तांनी केलेल्या खर्चाचे पुरावे नव्हते. अशा परिस्थितीमध्ये ते काम त्यांनी एका नवीन एजन्सीकडे देऊन काम करून घेतले. तसेच या कालखंडात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची नोंद घेऊन त्यावेळच्या विश्वस्तांकडून स्पष्टीकरण मागवले. या कारवाईनुसार संस्थेला पुर्वीच्या एका विश्वस्तांकडून रुपये दोन लाखांची वसुली करता आली. २००१ पासुन ते २०१२ पर्यंत कार्यरत असलेल्या आर्थिक व्यवहारांचीही योग्य चौकशी करुन अनगळ सरांनी बेजबाबदार कार्यकारिणी मंडळ सदस्यांवर योग्य ती शिस्तभंगाची कारवाई केली व त्याला त्यांनी सर्वसाधारण सभेकडून मंजुरी मिळवली.

२०१२-१३ साली संस्थेच्या सभागृह असलेल्या वास्तूची अवस्था फारच बिकट होती. दोन्ही सभागृहामध्ये भिंतीचे रंग निघाले होते. स्वच्छतागृहांचे पाईप फुटले होते व त्याचे पाणी खालच्या मजल्यावरील सभागृहात झिरपत होते. सभागृह भाड्याने घेऊ इच्छिणारे लोक ही अवस्था बघुन परत जात. त्यावेळी असे आढळुन आले की गेल्या ७० वर्षामध्ये संस्थेच्या वास्तूची, संस्थेच्या सभागृहाच्या ईमारतीची कुठलीही डागडुजी वा देखभाल करण्यात येत नव्हती. त्यामुळे सभागृहाचे भाडेरुपाने मिळणारे उत्पन्न बंद होण्याच्या वाटेवर होते. असेही आढळुन आले होते की, काही लोक सभागृह भाड्याने घेतल्यानंतर काही दिवसांनी ते रद्द करण्यासाठी येत होते. अशाप्रसंगी अनगळ सरांनी सर्व कार्यकारिणी मंडळ सदस्यांना विश्वासात घेऊन व पुर्णपणे लोकशाही पद्धतीने वास्तूच्या डागडुजीचे, रंगरंगोटीचे काम करण्याचे ठरविले व सर्वसाधारण सभेची परवानगी घेऊन संपुर्ण ईमारत डागडुजीचे, दुरुस्तीचे, रंगरंगोटीचे तसेच स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेतले. त्यानुसार रुपये एकशे तीस लाखाच्या खर्चास मंजुरी मिळवली व हे काम त्यावेळचे कार्यकारिणी सदस्य व सुप्रसिद्ध रंगतज्ञ श्री. मुकुंदराव हुल्याळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करुन घेतले. या सर्व झालेल्या खर्चाचे स्वतंत्र सनदी लेखपालाकडून ऑडिट सुद्धा करुन घेतले.

सांगण्यात आनंद वाटतो की, त्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कार्यकारिणी मंडळाच्या कार्यकालात सुमारे चार वर्षात वर झालेला दुरुस्तीचा रुपये एकशे तीस लाख खर्च पुर्णपणे वसुल होऊन संस्थेची गंगाजळी परत रुपये एकशे तीस लाखाच्या वर जाऊन पोहचली आहे. याचे कारण अनगळ सरांची व त्यांच्या टीमची निस्पृहता व सचोटी हेच म्हणावे लागेल.

अनगळ सर अनेक वेळा संस्थेच्या दाव्यांमध्ये बाजु मांडण्यासाठी न्यायालयात येत असत. परंतु त्यांनी कधीही संस्थेकडून एक नवीन पैसा घेतला नाही. त्यांनी त्यांचा अमुल्य वेळ देऊन व त्यांच्या असलेल्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग संस्थेला करून दिला. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कुठल्याही प्रकारची अधिकारशाही न गाजवता प्रत्येक सभेमध्ये सर्वांना विश्वासात घेऊन काम केले. तसेच इतर सभासदांच्या सुचनेचा आदर करून संस्थेच्या हिताचेच निर्णय घेतले. अध्यक्ष असतांना त्यांना असे आढळुन आले की, संस्थेच्या ईमारतीमध्ये राहणारे बहुतेक भाडेकरु ते स्वतः तिथे राहत नसुन त्यांनी त्या जागी पोट भाडेकरु ठेवले आहेत व अत्यल्प भाडे देऊन ते स्वतःची कमाई करत आहेत. अशा परिस्थितीत त्यांनी या गोष्टीची पुर्ण चौकशी केली व त्यानंतर त्यांनी

२०१३-१४ साली कार्यकारिणी मंडळासमोर या सर्व भाडेकरु राहत असलेल्या संस्थेच्या खोल्यांचा ताबा संस्थेची उद्दीष्ट्ये पुर्ण करण्यासाठी कायदेशीर मार्गाने कसा मिळविता येईल याचा प्रस्ताव मांडला व सर्व कार्यकारिणी मंडळाच्या सदस्यांच्या एकमताने भाडेकरुंविरुद्ध ते राहत असलेल्या खोल्या खाली करून घेण्यासाठी व न्यायालयात जाऊन त्याचा ताबा मिळविण्यासाठीचा व या कामासाठी वकील नेमण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. या प्रस्तावास नंतर सर्व साधाराण सभेनेही एकमताने मंजूरी दिली. त्यांच्या कायदेविषयक असलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर त्यांनी संस्थेसाठी करून देण्याचे आवाहन स्विकारले. ते ठासुन सांगत असत की, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार न्यासाला त्यांची उद्दीष्ट्ये पुर्ण करण्यासाठी, कुठल्याही भाड्यावर दिलेल्या वास्तुचा ताबा मिळविण्याचा अधिकार आहे. त्यांच्या आवाहनानुसार भाडेकरु राहत असलेल्या सर्व खोल्यांचा उपयोग मध्यवर्ती मंडळ गरीब मुलांसाठी वसतीगृह चालविणे, पीडीत महिलांसाठी वसतीगृह, मोठे ग्रंथालय, अभ्यासिका या संस्थेच्या उद्दीष्टपुर्तीसाठी संस्था करु शकते. त्यांनी घेतलेल्या या अभूतपुर्व निर्णयाचा फायदा संस्थेला लवकरच मिळणार आहे. कारण संस्थेने भाडेकरूंविरुद्ध लघुवाद न्यायालयात केलेल्या ३० दाव्यांपैकी २ दाव्यांमध्ये संस्थेच्या बाजूने निकाल लागला असून या दोन्ही जागा लवकरच संस्थेच्या ताब्यात येतील. याचा मुख्यत्वे लाभ मध्यवर्ती मंडळाला त्याची विश्वासार्हता वाढविण्यासाठी व बाहेरगावी राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे वसतिगृह स्थापण्यासाठी होणार आहे. जेणेकरून भविष्यात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांची पिढी मध्यवर्ती मंडळाला व अनगळ सरांना नेहमीच आठवणीत ठेवील. विचार करा, गेल्या ७० वर्षात संस्थेच्या कुठल्याही विश्वस्तांनी हा विचार केला नव्हता. परंतु आपल्या सगळ्यांच्या भाग्याने अनगळ सर अध्यक्ष झाले आणि भविष्यात लवकरच आपल्याला या सर्व जागांचा ताबा मिळणार आहे. या त्यांच्या धाडशी निर्णयाबद्दल मध्यवर्ती मंडळाचे सर्व आजीव सदस्य व पुढची पिढी नेहमीच ऋणी असेल. अनगळ सर नुसतेच कायदेतज्ञ नव्हते, ते संगीताचे गाढे तज्ञ होते. संगीतांचा त्यांचा हा व्यासंग खरोखरच वाखाणण्याजोगा होता. याचा अनुभव मी अनेकवेळा घेतलेला आहे. कुठल्याही संगीताच्या कार्यक्रमात किंवा जुनी गाणी ऐकतांना, त्या गाण्याचे कवी, संगीतकार व राग ते आत्मविश्वासाने सांगत. जुन्या चित्रपट संगीताविषयी त्यांचे ज्ञान अगाध होते कारण ते त्या गीताचा कवी, संगीतकार, राग याच्याशिवाय चित्रपटाचे नाव व चित्रपटातील प्रसंग व वर्ष पटकन सांगत. आपण विचार करा, त्यांची स्मरणशक्ती काय असेल व त्यांचे संगीताचे ज्ञान काय असेल. अनगळ सरांचे कायदेविषयक ज्ञान तर अगाध होते कारण वयाच्या ८४ वर्षीसुद्धा उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाच्या दाव्यासंबंधी व कायद्याच्या बाबीसंबंधीचे दिलेले निर्णय ते पटकन सांगत. तसेच त्यांच्या हाताची बोटे वयोमानानुसार चालत नसत. तरीसुद्धा ते एका बोटाने दोन-दोन पानांचे दावे स्वत: संगणकावर टाईप करत. अनेक तरुण वकील व नागरीक त्यांचेकडे नेहमीच सल्ला मागायला येत असत व ते कुठलाही मोबदला न घेता देत असत. त्यांचा नेहमीच कल सर्वांना मदत करण्याचा असे. मी व माझ्यासारखे अनेक यांनी याचा लाभ घेतला आहे. यासंबंधी एक ज्वलंत उदाहरण म्हणजे विलेपार्ले संस्थेची तळमजल्यावरील जागा जी पंजाब नॅशनल बँकेकडे भाड्यानी दिली होती त्याचा ताबा त्यांनी न्यायालयात जाऊन यशस्वीपणे संस्थेला मिळवून दिला. अनेक सभासद यासंबंधी साशंक होते. परंतु सरांच्या कायद्याच्या अनुभवाच्या जोरावर ही जागा संस्थेला गेल्या वर्षापासून परत मिळाली असून आज संस्थेच्या उत्पनांमध्ये १० लाखाची वाढ झाली आहे. हे केवळ अनगळ सरांमुळेच शक्य झाले. तसेच मध्यवर्ती मंडळाची नोंदणी कंपनी लॉ कायद्याखालीही झाली होती व मध्यवर्ती मंडळाला अनेक कायदेशीर अडचणी येत होत्या. पुर्वीच्या विश्वस्तांनी कंपनी कायद्यातुन सुटका करुन घेण्यासाठी अनेक वकीलांकडे धाव घेतली होती. परंतु सर्वांनी हे अशक्य आहे असे सांगीतले होते. अनगळ सरांनी हेही आव्हान स्विकारले व २०१५ साली उच्च न्यायालयाकडून संस्थेच्या बाजूनी निर्णय आणून दिला. हा खरोखरच अभूतपुर्व निर्णय आहे कारण कलम २५ खाली (ना नफा ना तोटा) कंपनी लॉ कडे नोंदविलेल्या संस्थांपैकी फारच कमी संस्थांची मुक्तता उच्च न्यायालयाने त्यांच्या न्यायालयीन निर्णयाने केली आहे.

मी हे आपल्या सर्वांना सविस्तर सांगण्याचा प्रयत्न केला आहे कारण बहुतेकांना अनगळ सर काय होते याची कदाचित एवढी माहिती नसावी. अनगळ सर आज आपल्यात नाहीत. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो. परंतु या प्रसंगी अनगळ सरांनी दाखवुन दिलेल्या वाटेवर व त्यांनी निर्माण केलेल्या आदर्शांवर संस्थेची पुढे वृद्धी करणे हीच त्यांना खरोखर श्रद्धांजली ठरेल.

## 'आमचे नाना - एक गीताव्रती'

- **अ‍ॅड. सौ. मंजुश्री खांडेकर** (कन्या)

श्रीगुरुंना परमात्म स्वरुपाचे प्रतीक मानतात. त्यांच्या आठवणीने मन उचंबळून येते, अष्टसात्त्विक भाव जागृत होतात, नेत्र पाणावतात. असे माझे सद्गुरु कै. नाना म्हणजे एक महान व्यक्तिमत्त्व – एक गीताव्रतीच! नाना माझ्यापेक्षा २० वर्षांनी मोठे. माझ्या वडीलांच्यां स्थानी. माझ्या बालपणीच्या खूपश्या आठवणी माई व नानांच्या भोवती गुंफलेल्या आहेत. ठाणे-सावनेर-कळवण-उल्हासनगर येथे न्यायधिश म्हणून कार्यरत असणारे नाना म्हणजे आम्हा सर्वांचे भूषणच होते. त्यानंतर उच्च न्यायायलात श्रेष्ठ व अनुभवी वकील म्हणून नाव कमावले त्यासाठी त्यांनी घेतलेले अविश्रांत कष्ट, केलेला त्याग आम्ही बघितला आणि अनुभवला आहे. विशेष म्हणजे अत्यंत खडतर अश्या या वाटचालीच्या काळातही त्यांची प्रसन्नता, मिश्किल स्वभाव आणि शांत स्वभाव त्यांनी जराही ढळू दिला नाही. हा फार मोठा आदर्श नानांनी आमच्यासमोर ठेवला आहे. वैयक्तीक माझ्या बाबतीत तर नानांनी इतके काही दिले आहे, त्याची मोजदाद अशक्य! माझे माहेरपण, माझ्या मुलांचे लाड-कोड केले तेही अत्यंत प्रेमाने. जिव्हाळ्याने. त्यांच्या वाचनाचा दांडगा व्यासंग, अमोघ वक्तृत्व, कुठल्या विषयावर अभ्यासपूर्ण माहीती सांगण्याची कला बघून आम्ही थक्क होत असू. नकळत ते संस्कार आमच्यावर होत राहीले. ज्ञानयोगी म्हणजे काय असतो ते नानांकडे पाहून सहज समजे, संगीत, अध्यात्म, राजकरण, विज्ञान सर्वच क्षेत्रात त्यांच्या ज्ञानापूढे नतमस्तक! त्यांच्याशी गप्पा म्हणजे खरी मेजवानी असायची. एकदा अलीकडच्या काळात मी नानांना म्हटले तुम्ही एक लेखनिक ठेवा आणि तुमच्या आठवणी अनुभव लिहून काढा. त्याचे पुस्तक आपण काढू. आम्हा सर्वांसाठी ते खरंच मार्गदर्शक होईल. यावर ते फक्त हसत 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' असे म्हणाले। असा हा निष्काम निरासक्त कर्मयोगी होता. नाना म्हणजे आत्मविश्वास, नाना म्हणजे दृढनिश्चय. त्यांची मते ठाम असून आणि तितक्यांच परखडपणे ते मांडीत असत. देशस्थ ऋग्वेदी संघाचे तर एवढे महान कार्य ते करु शकले ते या सर्व गुणांमुळेच. सावरकरांसारखे नाना प्रखर राष्ट्राभिमानी होते. टिळक, आगरकरांसारखे परखड विचार मांडण्याची त्यांची हातोटी ही त्यांची खास गुण वैशिष्ट्ये. असे हे सर्व गुणसंपन्न नाना म्हणजे एक अजब व्यक्तिमत्त्व होते. त्याचे कारण म्हणजे कश्या कश्याचाच अहंकार त्यांना नव्हता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, देशस्थ ऋग्वेदी संघ, कौटुंबिक सदस्य (सासर-माहेरचे) या सर्वांचा नाना हा फार मोठा आधार होता. निष्काम, निरलस, निरपेक्ष आणि नि:पक्षपाती असे नाना सारं जीवन यज्ञार्थ जगले. कणखर – तितकेच शांत नाना

**स्थितप्रज्ञच! दु:ख ध्वानिद्विग्नमनः सुखवु विगतस्पृहः। वीतराग भयक्रोधः स्थितथीर्मुनिरुच्यते (२.५६)।।**

दू:खदायक प्रसंगी ज्याच्या मनाला खेद वाटत नाही, सुखांच्या प्राप्ती विषयी ज्याला मुळीच इच्छा नाही. तसेच ज्याचे प्रीती, भय व क्रोध नाहीसे झाले आहेत, असा मुनी स्थिरबुद्धी म्हटला जातो. शेवटच्या कॅन्सरसारख्या दुर्धर आजारात नानांनी जी आत्यंतिक सहनशक्ती दाखविली त्याला कडक सलाम, विनम्र अभिवादन! बिनतक्रार जे आहे, जसे आहे ते आनंदाने स्विकारण्याचा योग शिकावा तर नानांकडूनच! असा हा योगी १० मार्च फाल्गुन शु. ४ विनायकी चतुर्थी या दिवशी देवयान मार्गाने मार्गस्थ झाला. शुक्ल पक्ष, वाहनवेळ अग्नीची दिवसाची अभिमानी देवता आणि उत्तरायणाचा ६ महिन्यांचा हा काळ नानांसारख्या योग्याला परमगतीप्रत नेतो हे नि:संशय! असा हा विश्वातील थेंब सागरात विलीन झाला पण संपला नाही. त्याच्या सिमा नाहीशा होत त्याचं अस्तित्त्व सागराएवढं मोठं झालय. त्या अस्तित्त्वाच स्मरण करुन आपण पुढील आयुष्याची वाटचाल करुया. **'ॐ माधवाय नम:' नानांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!**

---

**Dear Nana Ajoba,** I'm happy I got a chance to see you in person 4 years. I have been really interested in the Mahabharat after you told me about the 10 avatars and how they each represent something different. I'm sorry. I don't talk much. I'm shy and I listen more than talk. I have many memories that I cherish such as when I would sit next to you when you read newspaper, and one time when you were explaining law to me because at that time I wanted to know law. I have a lot of respect for you and how you manage to stay positive in tough situations. I want to be like that when I end the stress to become a like you as you are very calm and collected, I'm also proud of that you're established yourself so well a lawyer and I want to do same for my career. I will try to visit in December I can! **- Shriya Angal** (नातू)

# मला भावलेले अनगळ साहेब...

अरविंद त्रि. हस्तेकर, सदस्य : समन्वय समिती, मध्यवर्ती मंडळ,
विश्वस्त: दे.ऋ.ब्रा.स. डोंबिवली मोबा. ९९८७५५३५७३ / ९०८२३८७६३५

डोंबिवली संस्थेच्या अध्यक्षपदाची माळ २००३ मध्ये माझ्या गळ्यात पडली. तेव्हापासून अधूनमधून मध्यवर्ती मंडळाशी संपर्क असायचा तथापि मागील कांही वर्षापूर्वी डोंबिवली संस्थेच्या श्री. श्रीकांत पाटसकर यांची मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारणीत नेमणूक झाल्यानंतर जास्त संबंध येत गेला आणि श्री. अनगळ साहेब, श्री. प्रभाकर कुलकर्णी आणि श्री. प्रभाकर संत यांच्याशी परिचय झाला. उभयतांच्या विचारांची देवाणघेवाण वाढत गेली आणि स्नेह निर्माण झाला.

त्यानंतर अनगळ बऱ्याचदा मिटिंगला बोलवत असत व मीही शक्यतो बऱ्याच मिटिंगला जात असे. मध्यवर्ती मंडळाच्या कारभाराविषयी अडीअडचणी विषयी मोकळेपणाने बोलत असत, त्यांच्या संकल्पना सांगत असत. बरेच वेळा मोबाईल वरुन सविस्तर बोलणे होत असे. डोंबिवली संस्थेची जडण-घडण वाटचाल, दैनंदिन कारभार, राबवित असलेले उपक्रम सर्व कार्यकर्त्यांचे योगदान, सभासदांचा सहभाग यांची ते उत्सुकतेने माहिती घेत व कौतुकही करीत. त्यांतील काही उपक्रम मध्यवर्तीत राबविता येतील का ? याचाही विचार होत असे.

याच सुमारास डोंबिवली संस्थेने एक जागा घेण्याचे ठरविले. ही संकल्पना त्यांच्या कानावर घातली आणि साधारणतः दहा लाख रुपये कमी पडत असल्याचे सांगितले. जागा घेत असल्याचा त्यांना खूप आनंद झाला आणि आठ दिवसांत त्यांनी कर्जरुपाने रुपये दहा लाख दोन वर्षाच्या मुदतीने संस्थेस दिले. यांत श्री. प्रभाकर कुलकर्णी आणि श्री. प्रभाकर संत यांचे ही सहकार्य लाभले. केवढा संस्थेवर विश्वास. विशेष म्हणजे डोंबिवली संस्थेने हे पैसे एका वर्षाच्या आतच त्यांना परत केले. त्यांचे तर त्यांनी फारच कौतुक केले आणि डोंबिवली संस्थेविषयी त्यांच्या मनात एक वलय निर्माण झाले जे नेहमी त्यांच्या बोलण्यात, भाषणांत जाणवत असे.

मध्यवर्ती मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया, त्या अगोदर घेतलेले निर्णय याविषयी ते फार समाधानी होते. सर्व निर्णय हे संस्थेचे हित डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आले. असे करतांना त्यांचा दूरदृष्टीपणा, पारदर्शकता, शिस्त, समतोलपणा, प्रामाणिकपणा याचा प्रत्यय आला. कांही बाबतीत कटूता ही त्यांच्या वाट्याला आली. परंतु कायद्याची सर्व माहिती असल्याने त्यांनी सर्वांचे शंका निरसन केले. प्रथम संस्थेचे हित जपणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते.

समन्वय समितीची संकल्पना मी त्यांना विशद केली. त्यांना ती पटली आणि त्यांनी लगेच त्याला त्यावेळेस तत्त्वतः मान्यता दिली. तुम्ही कामाला सुरुवात करा. प्रवास खर्चाकडे बघू नका आणि मागायला संकोचही करु नका असे मला सांगणारे अनगळ साहेब माझ्या माहितीप्रमाणे मध्यवर्तीच्या कामानिमित्त कोर्ट, चॅरिटेबल ऑफिस व इतर ठिकाणी बरेच फिरत असत, परंतु कधीही संस्थेकडून पैसे न घेता, स्वतःच्या खर्चाने जात असत. किती मोठेपणा.

मध्यवर्ती मंडळाच्या आत्ताच झालेल्या निवडणुकांच्या तारखा, त्यांत फॉर्म भरण्याच्या प्रक्रिया आणि त्यावेळी अनपेक्षित घडलेल्या घटनेने ते फार व्यथित झाले होते, मानसिक तणावाखाली होते. आम्ही दोघेच बसलो होतो, त्यांची मानसिक व्यथा ते सांगत होते. डोळयांत अश्रू होते. मला ही गहिवरुन आले. बोलणे चालू असतांनाच तिसरे गृहस्थ आले. आम्ही विषय थांबवला. घरी डोंबिवलीला आलो. डोक्यातून विषय आणि डोळ्यासमोरुन अनगळसाहेब काही जाईनात, चलबिचल झाली. रात्री त्यांना फोन लावला. अर्धा पाऊण तास फोनवर बोलत होतो, समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होतो. या वयातही आपणास बरेच काही शिकावे लागत आहे. आणि कुणालाही विश्वासाने गृहित धरुन निर्णय घेऊ नये या निर्ष्कषाप्रत आम्ही तेव्हा आलो. आठवणी भरपूर आहेत त्याही अल्पावधितल्या.

मध्यवर्ती मंडळाच्या बाबतीत अनगळ साहेबांनी घालवून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे, संस्थेच्या दैनंदिन कारभाराचे व्यवस्थापन, संस्थेचे उपक्रम, उद्दिष्टे, संस्थेचे हित, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता, एकोप्याने, एकदिलाने आणि शालीनतेने वागणे इत्यादी गोष्टी, आपणा सर्वांनी यापुढे मनापासून करण्याचा प्रयत्न करणे हिच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी असून ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## संस्थेचा आधारवड गेला!

- **श्री. शरद पारसनीस**, कार्यकारी सदस्य-मध्यवर्ती मंडळ

आपल्या अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाचा आधारवड गेला हे लिहताना आम्हांस अतीव वेदना होत आहेत. आपल्या संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड. माधव अनगळ यांचे दुःखद निधन ७ एप्रिल २०१९ रोजी झाल्याचे कळताच आम्हांस अत्यंत धक्का बसला. आपल्या छोट्या कारकर्दीत त्यानी अफाट व अचाट कर्तृत्व दाखवून आपल्या संस्थेची घडी शिस्तबद्धपणे घालून दिली व संस्थेस उर्जितावस्थेत नेण्याचे काम अत्यंत धडाडीने केले. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल संस्था त्यांची कायम ऋणी आहे! मी विविध संस्थेत सुमारे १५ वर्षे कार्यकारी मंडळात काम केले असून विविध अध्यक्षांबरोबर काम केले आहे. परंतु ॲड. माधव अनगळ यांच्याबरोबर काम करताना अतीशय आनंद वाटत असे. त्याचे कारण त्यांनी स्वतःस संस्थेचा निरलस सेवक म्हणून काम करुन लोकांसमोर आदर्श ठेवला आहे. ज्यावेळी संस्था अडचणीत होती व कामे विस्कळीत झालेली होती त्यावेळी कै. ॲड. माधव अनगळ यांनी ही कामे मार्गी लावून संस्थेची घडी अत्यंत व्यवस्थीत घालून दिली व संस्थेपुढे कामाचा नविन मानदंड निर्माण केला.

संस्थेच्या विश्वस्तांपुढे जूने खटले निलंबित असताना सर्वांना एकत्रितपणे घेऊन त्यांनी संस्थेस हितकर असा मार्ग निवडला. आपल्या सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांच्या मदतीने संस्थेच्या जीर्ण झालेल्या वास्तुचा अत्यंत कल्पकपणे कायापालट केला. यासाठी बोलविण्यात आलेल्या विशेष सभेत सभासदाना विश्वासात घेऊन दुरुस्तीसाठीचा खर्च मंजूर करुन घेतला व काटेकोर नियोजन करुन संस्थेच्या वास्तूस नविन स्वरुप प्राप्त करुन दिले! संस्था बंद पडल्यावर तिचा पुनः ताबा घेण्याचा आदेश कार्यकारी मंडळास दिल्यावर सुद्धा तो ताबा मिळविण्यासाठी कै. ॲड. माधव अनगळ, श्री. संत व माने शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गेले व आदेश दाखवून व स्वतः कुलूप तोडून आपल्या संस्थेचा ताबा घेतला. त्यांनी दाखविलेली धडाडी निश्चितच वंदनीय आहे! संस्थेवर असंतुष्ट सभासदांनी विविध कोर्टात केसेस दाखल केल्या. इतकेच नव्हे तर बिनबुडाचे आरोप केले होते. कै. ॲड. अनगळ यानी अत्यंत करारीपणे त्याविरुद्ध लढा दिला व संस्थेस मानाचे स्थान यशस्वीपणे मिळवून दिले. वैशिष्ट्य म्हणजे संस्थेकडून कोणताही खर्च घेतला नाही. कार्यकारी मंडळातील सदस्यांनी रक्कम ऊभी केली कारण दावे कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या नावे होते. अशारीतीने त्यानी स्वतः रक्कम देऊन मंडळापुढे एक नविनच आदर्श उभा केला! आपली संस्था कंपनी कायदा व धर्मादाय न्यास अशा दोन कायद्याखाली येत होती. कंपनी कायद्यातून आपली संस्था काढण्याचे अनेक प्रयत्न पुर्वीच्या कार्यकारी मंडळानी केले परंतु त्यांस यश आले नाही. कै. ॲड. माधव अनगळ यांनी अत्यंत कुशलतेने कंपनी-बोर्डाकडे संस्था वगळण्यासाठी दावा दाखल केला व त्याच्या मार्गदर्शनामुळेच आपली संस्था कंपनी कायद्यापासून मुक्त झाली. हे अत्यंत किचकट काम त्यांनी सहजपणे साध्य केले! कै. ॲड. माधव अनगळ यांचा मोठा सद्‌गुण म्हणजे कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांस समजून घेणे. सदस्यांनी प्रसंगी विरोध दर्शाविला तरी त्याबद्दल कटूता न धरता संबधितास विश्वासात घेऊन समजविण्यात त्यांचा हातखंडा होता! कार्यकारी मंडळातील सदस्यांस त्याच्या विषयी आदर वाटत असे. सर्वांस मनमोकळेपणाने आपली मते मांडण्यास ते परवानगी देत असत. कार्यकारी मंडळातील काही निर्णय सभासदास न पटल्यास त्याचे कारण समजाऊन घेत व सभासदाच्या मनात कोणताही किंतू राहणार नाही याची खबरदारी घेत. त्यांच्या या मनमिळावू वृत्तीमुळेच सर्वांनाच त्यांच्या विषयी आदर वाटत असे. कै. ॲड. माधव अनगळ यांचा दूसरा मोठा गूण म्हणजे खंबीर भूमिका घेणे! त्यांनी कधी आपली भुमिका कोणावर लादली नाही. परंतु कार्यकारी मंडळाने घेतलेल्या कणखर भुमिकेपासून ते कधीही विचलीत झाले नाहीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वार्षिक सभेत अत्यंत नाजुक परिस्थिती निर्माण झाली असता त्यानी ती कठोरपणे, धैर्यानी सांभाळली. भाडेकरुंच्या बाबतीत आपण त्यांचेवर दाखल केलेले दावे म्हणजे संस्थेच्या भविष्यातील हिताकरिता त्यानी घेतलेला. निर्णय होय! वरकरणी काहीना हा निर्णय पटला नसला तरी संस्थेचे हितासाठीच हा निर्णय घेतला हे विसरता येणार नाही! कै. ॲड. माधव अनगळ यांनी बाहेरगांवच्या सभासदांना राहण्यास अथवा त्यांच्या मुलांस शिक्षणासाठी मुंबईत जागा मिळावी या उदात्त हेतूने मंडळाच्या भाडेकरुंवर दावे दाखल केले! यांतील काही दाव्याचे निकाल मंडळाच्या बाजूने लागलेसुद्धा आहेत. यावरुन त्यांचे नियोजन किती अर्थपूर्ण होते याचा बोध होतो. कै. ॲड माधव अनगळ यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड मनोबल / इच्छाशक्ती. आपल्या आजारपणांत सुद्धा मंडळाच्या भाडेकरुंच्या दाव्यात संस्थेतर्फे शेवटपर्यंत साक्ष दिली त्यांचा एकच ध्यास होता तो म्हणजे ही वास्तु सभासदांच्या हितासाठीच वापरावी व त्यांचे दुवे घ्यावेत. असे एक करारी, कर्तव्यनीष्ठ, धोरणी व्यक्तीमत्व आज आपल्यात नाही याची खंत वाटते. परंतु त्यांची अपूर्ण ध्येयधोरणे कणकखरपणे पूर्ण करणे हिच खरी श्रद्धांजली!

## Advocate Madhav Angal

- Dr. L. M. Dani
Mob. 9820437073 Email : laxmikant1411@yahoo.com

He served the Deshastha Rigvedi Brahmin Sangh, Vile Parle for 30 years. He defended and argued on behalf of DRBS, Vile Parle in court matters to win the cases. He was a Visionary Leader. He had a strong Will Power. He was clear-headed, Confident, Tough, Bold and Determined. He had a Razor Sharp Mind, Nerves of Steel and Photographic Memory. He was a man of uncompromising commitment and relentless passion. He was an Encourager. He gave Attention, Affection and Appreciation to people. His every smile, every loving word, every kind action was a reflection of the Beauty of his soul. Strong with his will power, committed for his duties, Disciplined by nature. He lead the DRBS, Vileparle Sangh.

He was a solution finder not a problem highlighter. He was a positive thinker not only expecting the best to happen but also accepting whatever happens is for the best. He had the purity of heart and clarity of mind. He lived a meaningful life by being honest, being strong, real, humble and able to reach out and touch the lives of others.

He was a Role model and Fatherly figure.

The right temperature of a house is not maintained by heaters and Air conditioners but is maintained by warm hearts and cool minds. He would treat people with courtesy, politeness, respect and compassion. He was a great source of inspiration for all of us.

**Dedicated To :** Late Advocate Madhav Angal, Vile Parle, Mumbai A Legal Luminary who guided several Social Institutions rendering self-less service. A Good Friend, Philosopher and Guide. A Visionary Leader. A Positive Thinker. A Role Model.

### कै. ॲड. अनगळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

१) श्री. सुरेश दिनानाथ जोशी, तालुका प्रचार प्रमूख, भा.ज.पा. मंगळवेढा २) श्री. अनंत चिंतामणी कुळकर्णी, मंगळवेढा ३) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मंगळवेढा ४) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, भुसावळ ५) श्री. प्रसाद भोंडे, गुरुजी, अध्यक्ष, दे. ऋ. ब्रा. संघ, भुसावळ ६) श्री. गणेश वढवेकर, कार्याध्यक्ष, दे. ऋ. ब्रा. संघ, भुसावळ

**नवीन सभासद : अकोला :** १) श्री. राम पुरुषोत्तम तऱ्हाळकर २) श्री. राजीव मधुकर टांकसाळे ३) सौ. ज्योती शरदराव जोशी ४) श्री. शरदराव गोविंदराव जोशी ५) श्री. सुहास सुरेशराव पुसेगांवकर ६) श्रीमती सुलभा सुरेशराव पुसेगांवकर ७) श्री. अजय दत्तात्रय सुरडकर ८) श्री. प्रकाश गोपाळराव देशपांडे ९) श्री. नारायण त्र्यंबकराव देशपांडे १०) श्री. ऋषीकेश शामराव कुळकर्णी ११) सौ. संगीता शामराव कुळकर्णी १२) श्री. शाम प्रभाकर कुळकर्णी १३) श्री. सचिन श्रीराम पोतदार १४) श्री. श्रीपाद यादवराव कुळकर्णी **सोलापूर :** १५) श्री. सुरज संजय हुंडेकरी १६) श्री. जयवंत विश्वंभर कुलकर्णी १७) श्री. विनोद अनिल कामतकर १८) श्री. विनायक पांडुरंग आराध्ये १९) सौ. संध्या दत्तात्रय आराध्ये २०) श्री. शिरीष कमलाकर मंगरुळकर २१) श्री. विजयकुमार धोंडोपंत देशपांडे **डोंबिवली :** २२) सौ. प्रिया जितेंद्र देशपांडे २३) श्री. अभिजीत अनिल रेडगावकर २४) श्री. श्री. आशीष कुंजन उदास २५) श्री. दीपक अविनाश कुलकर्णी २६) श्री. प्रदीप दत्तात्रेय कुलकर्णी २७) श्री. दत्तात्रय चंद्रशेखर देशपांडे **मुलुंड :** २८) श्री. प्रकाश रामचंद्र लोणकर २९) श्री. सुनिल काशिनाथ राईलकर ३०) सौ. सुरेखा सुधीर संत **वसई :** ३१) सौ. मानसी मंदार अंबेवाडीकर ३२) सौ. अनुष्का पंकज कुलकर्णी **अन्य गांवे:** ३३) श्री. चंद्रकांत अ. सोलापूरकर - गुजरात ३४) श्री. नितिन चंद्रकांत उंबाजकर - कुर्ला ३५) श्री. जितेंद्र वसंत देशपांडे - कल्याण ३६) श्री. योगेश सुरेश काळे - पूणे

# कर्तत्व कठोर पण संस्थेच्या हितासाठी तडजोडीचाही मार्ग काढणारे अनगळ

- **श्री. प्रभाकर संत**, कार्यकारी सदस्य, मध्यवर्ती मंडळ

कै. अनगळ व माझे ऋणानुबंध गतजन्मीचेही असावेत अशा घटना त्यांच्या व माझ्या या जन्मी घडल्या आहेत. मी १९४९ ते १९६० सरकारी नौकरीत एका कार्यालयाचा हेड क्लार्क होतो. रा. स्व. संघाने ती नौकरी सोडून कल्याणांत एका शैक्षणिक संस्थेची संस्थापना करुन एका माध्यमिक शाळेची सुरवात करुन पूर्ण जबाबदारी स्विकारा अशी आज्ञा केली. त्याप्रमाणे मी नौकरी सोडली. सरकारी नौकरी सोडल्याने माझे वडील अक्षरशः ढसाढसा रडले. एकूण सर्वांनीच मला मूर्ख ठरवले. मी नौकरी सोडत आहे हे सांगायला माझ्या साहेबांकडे उल्हासनगर येथील एन्सा हाऊसमध्ये गेलो तेव्हा अनगळ साहेब तेथे सहज गप्पा मारण्यासाठी साहेबांचे घरी आले होते. त्यांनी माझा नौकरी सोडण्याचा निर्णय योग्य असल्याचे सांगून मला शुभेच्छा दिल्या. त्या काळात माझ्या निर्णयाला योग्य ठरवून शुभेच्छा देणारे एकमेव "अनगळ" साहेब होते. पण तसा काहीच परिचय नव्हता.

त्यानंतर जवळ जवळ २२-२३ वर्षांनी माझा अनगळांशी पुन्हा संबंध आला. १९८० ते १९८६ या काळांत मी शिक्षक, आमदार म्हणून कार्यरत होतो. त्या काळांत मी अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळून, गुन्हेगाराना शिक्षा होईल असे पाहीले. त्यात भूविकास बँकेचे प्रकरण ३ वर्षे गाजले व माझ्यामुळे सहकार कायद्यांत बदलही करावा लागला. तेव्हा मला त्या बँकेतूनच गुप्तपणे एका वरीष्ठ कर्मचाऱ्यानी सर्व माहीती पुरवली होती. त्या विशिष्ट अधिकाऱ्यास वकीली सल्ल्याची नितांत आवश्यकता होती त्यांनी ॲड. अनगळ ह्यांची निवड केली कारण सर्वच गुप्तव्यवहार सांभाळून योग्य तो सल्ला अनगळच देतील असे त्यांना चौकशी अंती कळले होते. त्यांनी अनगळांना वकील (खाजगी स्वरुपांत) केल्याने माझा अनगळांशी २२-२३ वर्षांनी संबंध आला. हा संबंध मात्र खूपच काळ म्हणजे २-३ वर्षे राहीला. त्या काळांत किमान एक/दोन भेटी आठवड्याला होत असत. ते सर्व कार्य पूर्ण यशस्वी झाले व अनगळ व मी जीवाभावाचे मित्र ठरलो.

त्यानंतर पुन्हा २९-३० वर्षे कांहीच संबंध राहीले नव्हते. पण दे.ऋ.मध्यवर्ती मंडळाच्या नियुक्त कार्यकारी मंडळाचे ते अध्यक्ष व मी कार्याध्यक्ष अशी जोडी पुन्हा २०१२ साली नियतीने निर्माण केली. ह्या सर्व योगायोगाचे आश्चर्य वाटावे अशीच स्थिती असल्याने त्यांचे व माझे गतजन्मीचे ऋणानुबंध असावेत असे मला वाटते. मध्यवर्ती मंडळाच्या कामात त्यांचे अध्यक्षपद मला बरेच कांही शिकवून गेले. मी गेली ६०-७० वर्षे विविध संस्थांत काम करीत आहे. अनगळांसारखे कणखर अध्यक्ष जेमतेम २-४ माझ्या वाट्याला आले. ह्या २-४ कणखर अध्यक्षांनाही सर्वसाधारण सभा हाताळणे कीती कठीण जात होते हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. पण अनगळ एकमेव असे अध्यक्ष की जे कणखर असूनही त्यांनी योजल्याप्रमाणे संस्थेचे कामकाज पार पडेल यांत ते निष्णात होते. त्याचे अत्यंत आदर्श उदाहरण म्हणून गेल्या वेळची त्यांच्या कारकीर्दीतील अंतीम सर्वसाधारण सभा विचारांत घेण्यासारखी आहे. त्या सभेत प्रस्तूत केलेल्या जमाखर्च अहवालांत ढिगभर मुद्रण दोष निघाले. सभेचे त्यामुळे रणांगण झाले. चुका कबुल करुन, दुरुस्त करण्याचे दुर्भाग्य त्यांच्या कणखर स्वभावाच्या वाट्याला आले. पण ते त्यांनी कोणताही कणखरपणा न दाखवता उलट अत्यंत समजुतदारपणे व पडती बाजू घेऊन, कोणालाही दोष सभेत न देतां (सभेनंतर संबंधींतांची खरडपट्टी पात्र काढण्यांत कसूर केली नाही) ते दुर्भाग्य पार निकालांत काढले. हे त्यांचे कौशल्यपूर्ण वागणे खूपच अभ्यासनीय आहे. ती सभा अनगळच पार पाडू शकले. अन्य कोणाला ते जमलेच नसते.

पण हे जमाखर्च व अहवालाचे बुडते जहाज किनाऱ्याला लावल्यावर, क्षणांतच त्यांचा मूळ कणखरपणा पुढे प्रत्येक क्षणाला प्रगट झाला. तसा तो प्रगट करणे संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यकच होते. पुढील सर्व कार्यक्रमपत्रिका यशस्वी मार्गस्थ होणे जवळ-जवळ अशक्य होते. कारण ती कार्यक्रमपत्रिका यशस्वी होवू नये अशी पक्की तयारी करुन आलेले निदान एक तृतीयांश सभासद उपस्थितांत होते. ते विलक्षण आक्रमक होते. सभेचे रणांगण झाले. अनगळांनाही ते सारे शांत करणे शक्य नव्हते. पण अध्यक्ष म्हणून जबाबदारी होती. कार्यकारी मंडळातील कोणाचीही मदत न घेता त्यांनी कार्यक्रमपत्रीके प्रमाणे व कार्यक्रम पत्रिकेत नसलेले कांही कटू निर्णय संस्थेच्या हिताचे संरक्षण करीत सहजी नसले तरी आवश्यक त्या कणखरपणे यशस्वी केले. सभेत तट पडले पण सर्वांना बोलण्याची पूर्ण संधी दिल्यावर चर्चेला कंटाळलेल्या सभागृहांत त्यांनी एका पाठोपाठ एक निर्णय मताला टाकले व संस्थेच्या हिताचे पूर्ण संरक्षण केले. अशी सभा, असे रणांगण, असे कणखर, पण प्रसंगी मऊ असलेले विविध कौशल्याने मंडीत अध्यक्ष यांचे दर्शन

अलौकीक असेच होते. ती सभा माझ्या ह्रदयांत ठाण मांडून आहे व इतके दिवस झाले तरी रोज नव्याने त्या सभेचा मला अर्धबोध होतो आहे. अनगळांच्या मनांत संस्थेचे हीत हे प्रथम स्थानी होते. या सभेनंतर आजतागायत अनेक सभासद अनगळ विरोधांत भाष्य करीत आहेत व एका संलग्न संस्थेने त्यांच्या विरोधांत ठरावही केला आहे. पण हे सर्व अंगावर सहजी झेलून, कोणतीही कटू भावना न ठेवतां संस्थेचे हीतच त्यांनी जपले यांत त्यांचे जीवन सार्थकी ठरते. विरोध व कटुता घालवण्यासाठी अनगळ खुलासेवार सहज मतप्रदर्शन करुं शकतात. पण अशी कटुता व विरोध त्यांच्या हिशोबी शुन्यवत असल्याने ते त्या भानगडीत पडत नाहीत. फक्त संस्थेचे हीतच पाहतात हे अनगळांचे वैशिष्ट्यही सुयोग्य व सकारात्मक दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहे.

भाडेकरुंच्या संदर्भात, मी एक विस्तृत माहीतीचा आलेख अनगळांना सादर केला तेव्हां त्यांनी मी हे फारच मोलाचे काम केले असे सांगून वाकून मला नमस्कार केला व भाडेकरुंच्या केसेसचा निर्णय घेतला. वाकून मला नमस्कार केला ह्यांत माझा मोठेपणा नसून संस्थेच्या हिताचे काम मिळाल्याचा त्यांचा आनंद हिमालयाप्रमाणे उंची गाठणारा होता.

ते कणखर होते. पण लवचीकही होते. संस्थेच्या सभागृहाच्या दुरुस्तीचे काम प्रथमतः कार्यकारी मंडळात व सर्वसाधारण सभेत मंजूर होऊन, कामकाजाला सुरवात करण्यासाठी सत्यनारायणाची पूजा आयोजित केली होती. प्रत्यक्ष कामकाज सुरु होण्यापूर्वी या शेवटच्या टप्यावर एका कार्यकारी सदस्याने कांही आक्षेप घेतले. ते आक्षेप पुढे आल्यावर शेवटच्या टप्यापर्यंत झालेले निर्णय असूनही प्रत्यक्ष कामकाज सुरु झाले नसल्याचे लक्षात घेऊन त्यांनी पूर्वीचे सर्व निर्णय क्षणांत बाजूला सारले व कोणताही आक्षेप येणार नाही अशी नव्याने तपशीलवार व्यवस्था (आक्षेप घेणाऱ्याचे ही समाधान करणारी) केली व अत्यंत पारदर्शकपणे संस्थेच्या सभागृहाचे एक कोटी तीस लाखाचे काम सर्वांची प्रशंसा मिळेल अशा पद्धतीने पूर्ण केले. अत्यंत कणखर, प्रसंगी कोणाची पर्वा न करता संस्थेच्या हिताला प्राधान्य देणारे अनगळ, आपल्या प्रतिमेला तडा जाणार नाही या साठी किती लवचीक झाले होते ह्याचाही अभ्यास करण्यासारखा आहे. अनगळांचे शेवटचे आजारपण अनेक वेदनांचे होते. पण ते त्यांनी कोणतीही कुरकुर न करता, स्वतःचे स्वतः सहन केले आणि त्याच काळांत संस्थेची जबाबदारी ही पार पाडली. ह्यासाठी विलक्षण खंबीर मन असावे लागते. गोव्याच्या पर्रीकरांचे उदाहरण मोठ्या परिघातले व मोठ्या व्याप्तीचे आहे. पण अनगळांच्या शेवटच्या आजाराचे व संस्थेच्या जबाबदारीच्या संदर्भात समान असेच आहे. महाराष्ट्र टाईम्सच्या अग्रलेखात पर्रिकरांचे संदर्भात पुढील विधान आहे. मृत्यु पावलापावलाने झडप घालत असतांना कामावरची निष्ठा मावळू न देणे ही जमणारी बाब नसते. त्यासाठी चिवट, झुंजार मन लागते. ती पूंजी पर्रीकरांकडे विपुल होती. हाच अभिप्राय अनगळांना तंतोतंत लागू पडतो, हे लक्षांत घेण्यासारखे आहे.

अनगळ अद्वितीय होते. Nothing Parallel. त्यांनी प्रसंगी कटूता घेऊनही संस्थेच्या हिताला प्राधान्य देवून पारदर्शक उच्च आदर्शाचे दर्शन घडवले. आपण सारे हे दुर्मीळ संचीत, मनांत जपून ठेवू या व कृतीत उतरवू या. अनगळांना स्वर्गात स्थान असणारच आहे. ते सुखाचे स्थान अनगळ लाथाडतील व वंचीतासाठी त्यांच्या हिताचे कार्य करण्यासाठी पुनरजन्म घेतील असा विश्वास आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

---

## डॉ. सागर जोशी यांच्या दुसऱ्या डेंटल क्लिनीकचे पुण्यात उद्घाटन !

डॉ. सागर व सौ. डॉ. अमृता जोशी यांच्या मुकूंदनगर पुणे येथील दुसऱ्या डेंटल क्लिनीकचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळी पुणेचे उपाध्यक्ष मा. श्री. राजेंद्र पटवर्धन यांचे शुभहस्ते करण्यात आले. मंगळवेढ्यासारख्या ग्रामीण भागातून येऊन पुणे येथे "मोरया डेंटल क्लिनीक" गेले ७ वर्षे यशस्वीपणे चालवून दुसरे क्लिनीक, मुकूंद नगर येथे सुरु केल्याबद्दल डॉ. सागर व डॉ. अमृता जोशी यांचे सर्व उपस्थितांनी अभिनंदन व कौतुक केले.

---

**सामुहिक व्रतबंध** : मंगळवार दि. ७ मे अक्षय तृतीया (गरीब व होतकरु बटुंच्या मुंजीचे संस्कार मोफत केले जातील) स्थळ : मनोहर मंगल कार्यालय, एरंडवणे, पुणे. **आयोजक :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कोथरुड-कर्वेनगर, पुणे, आणि श्री देवदेवेश्वर संस्थान, पर्वती, कोथरुड यांचे सहकार्याने. **संपर्क :** ● श्रीराम कुलकर्णी (कार्याध्यक्ष) ९६८९७ - ९०१०५, ०२०-२५४४१३३३ ● डॉ. अरुण हुपरीकर (अध्यक्ष) ९४२३५०७२८० ● सौ. साधना ओढेकर (सहसचिव) ८२७५५०९३०८

# जीवनसाथी-सुयोग्य निवडीसाठी

पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील
उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित,
आर्मि, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाची
किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी

★★★

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५**

**शुक्रवारी बंद**

**संपर्क : २४३०५६०७**

**मेघा दामले**

इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड,
सेनाभवनसमोर, माहीम, मुंबई - ४०० ०१६.



# श्री. शरदचन्द्र देशपाण्डे

M.A.L.L.B.

**ADVOCATE**

Asst. Secretary L.I.C. of India Z. O. Hyd. (Retired)
H. No. 8-3-978/13, Shri Nagar Colony, Hyd.

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुम्बई
Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मण्डळ शाखा, हैद्राबाद
Life Member : मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद
Life Member : महाराष्ट्र मंडळ, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : मराठी साहित्य परिषद, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : बृहन् महाराष्ट्र मंडळ, नई दिल्ली.
Life Member : Sr. Citizen Seva Samithi, Hanuman Nagar, Hyd.
Treasurer : Sat Sri Keshav Swamy Seva Samithi, Hyd.
Life Member : Insurance Corporate Retired Employees Association
Life Member : Bharat Gunavardhak Sanstha, Hyderabad
Exe. Committee Member : Shankar Vachanalaya, Telengana, Hyd.



ISO 9001 : 2015 प्रमाणित

# समर्थ सहकारी बँक लि.सोलापूर

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. फोन : ०२१७ - २७४४२१०, २७४४२१३, २७४४२१४

## २००० कोटींच्या मिश्र व्यवसायाकडे वाटचाल

✻ समर्थ बँकेच्या उपलब्ध सेवा ✻

MOBILE BANKING | RTGS/NEFT | IMPS | E-COM/POS | E- PAYMENT | FOREIGN CURRENCY EXCHANGE | LOCKERS | GAS SUBSIDY | BHARAT BILLPAY

**जेष्ठ नागरिकांसाठी व्याजदर ९% (१ वर्षासाठी)**

३२ शाखांमधुन कार्यरत

✻ मुंबई - दादर ०२२- २४३२४४०१/०२ ✻ कल्याण-०२५-१२२३२१२१/२३ ✻ ठाणे - ०२२-२१७३७७४७/४८ ✻ वाशी - ०२२-२७८८००१४/१५
✻ पुणे - शिवाजीनगर - ०२०-२५६५७५५६/२५६५७५६५ ✻ हडपसर - ०२०-२६८९०७१२/१३ ✻ चिंचवड - ०२०-२७३७१८१८/२७३७१९१९
बाणेर ०२०-२७२९२५००/०१ ✻ कोथरुड- ७२७६०८२१०१/७२७६०७२१०२ ✻ सिंहगड रोड- ९८८१७११८३० ✻ पिंपरी-०२०-२७४१२९२९/२७४१३०३०
✻ कोल्हापूर - ०२३१- २५३११४४/४५ ✻ सांगली - ०२३३- २३०२०६५/६६ ✻ मार्केट यार्ड पुणे - ०२०- २९७०६५५०/२९७०५३५०

✻ सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण ५८ शाखा कार्यरत ✻

IndusInd Bank

My ACCOUNT
My NUMBER

# Make your Birth Date
## as your Bank Account Number.

120000 11275

Our Other Innovations

IndusMobile
FINGER PRINT BANKING
Easy, Cool & Safe

VIDEO Branch

Choice Money ATM

QUICK REDEEM SERVICE

DIRECT CONNECT

CASH MOBILE ATM

CHECK ON CHEQUE

For more details, please call our 24 x 7 Phone Banking Numbers : 1880 500 5004/ +91 22 4406 6666.
Alternately, you can visit our website : www.indusind.com

MRH

**Mukund R. Hulyalkar**

painttech CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

## Mukund R. Hulyalkar - Paint Technologist

| | |
|---|---|
| President | : Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : ISSPA Central Committee |
| Secretary | : Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : Winner's Circle - Thane |
| Member | : BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com



नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. विलास जोशी अत्यंत नम्रपणे
ॲड. अनगळसाहेबांना अभिवादन करुन त्यांचे आशिर्वाद घेतांना.



मध्यवर्ती संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. विलास जोशी व
पार्लेकर सहकाऱ्यांसोबत आनंदाचे क्षण



**आनंदाचे क्षण :**

अध्यक्ष श्री. विलास जोशी ह्यांनी दिलेला शब्द खरा केला. संस्थेचा कार्यालयाचे नुतनीकरण केल्यानंतर कै. ॲड. अनगळ साहेबांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करुन अध्यक्षांच्या खुर्चीत कै. ॲड. अनगळ साहेबांना सन्मानाने बसवले.





ज्येष्ठ सहकारी श्री. एन. बी. एच. कुळकर्णी तसेच इंडसइंड बँकेचे सीईओ,
संस्थेचे मान्यवर सल्लागार श्री. झरेगांवकर यांच्यासोबत काही क्षण.

**R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20,** Published on 15th of every month, Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## खालील मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह

### वैशिष्ट्ये

वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन

मंगल कार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, सम्मेलन ह्यासाठी पण उपलब्ध

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दुरध्वनी : २४३० २२ ७३ / २४३० ७५७३ ● Email : aadrbm@gmail.com


मुद्रक, प्रकाशक आणि संपादक प्रभाकर अनंत संत यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या वतीने संदीप ग्राफीक्स, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१, येथे छापून अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक श्री. प्रभाकर अनंत संत